**वसई-विरार शहर महानगरपालिका**
**मुख्य कार्यालय, विरार**
**ता. वसई, जि. पालघर**

---

इसारा रक्कम – ५,०००/-

जा.क्रं. वविशम/उपा/अग्नि/ ०२ /२०२५
दिनांक :- ०३/०४/२०२५

## जाहिर दरपत्रक

सर्व पुरवठादार, संस्था व व्यक्ती यांचे माहितीसाठी कळविण्यात येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती एच येथील डि एम पेटीट हॉस्पिटल इमारतीमधील स्थायी स्वरुपाची यंत्रणा फायर हायड्रंट सिस्टिम व फायर अलार्म सिस्टिम यंत्रणेची दुरुस्ती करणे कामी इच्छुक व्यक्ती, पुरवठादार व संस्था यांचेकडून दिनांक १६ /०४/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजे पर्यंत बंद पाकिटातून दरपत्रक (कोटेशन) मागविण्यात येत आहेत.

| Sr. No | Item Description |
|---|---|
| 1 | Fire Hydrant System |
| 2 | Fire Alarm System |
| 3 | Refilling of Fire Extinguisher |

### अटी-शर्ती

१) पुरवठादाराने स्वत:चे लेटरपॅडवर दरपत्रक सादर करावे. दरपत्रकावर वस्तू व सेवा कर नोंदणी क्रमांक (GST) अथवा वस्तु व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

२) मालकाचे / संस्थेचे पॅनकार्ड झेरॉक्स प्रत जोडण्यात यावे.

३) दरपत्रक मुदतीत व वेळेमध्ये मुख्य कार्यालयातील आवक जावक विभागात सादर करणे बंधनकारक राहील.

४) दरपत्रकास मंजुरीची समज दिल्यानंतर कार्यालयात उपस्थित राहून करारनामा करुन ७ दिवसांत करारनामा करावयाचा आहे. मुदतीत करारनामा न केल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.

५) दरपत्रकात कामाचे दर हे सादर करताना मुळ किंमत (वाहतुक व मजुरीसह) व वस्तू व सेवाकर (GST) इत्यादी वेगवेगळे दर्शविण्यात यावेत.

६) उपरोक्त दरपत्रकामधील नमूद केलेल्या सर्व कामाचे एकत्रित दर (मजुरीसह) नमूद करण्यात यावेत. अशी दरपत्रके विचारात घेतली जातील.

७) मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार मा. उप-आयुक्त यांना राहिल.

८) वरील अटींचे पालन जे पुरवठादार करणार नाहीत त्यांचे दरपत्रक पडताळणी अंती अपात्र ठरविण्यात येईल.

९) यासंबधीची दरपत्रके स्वत:चे लेटरपॅडवर बंद पाकिटातून दिनांक १६/०४/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता मुख्य कार्यालय, विरार (पश्चिम) येथे सादर करावीत.

मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दिनांक १६/०४/२०२५ रोजी सांय. ४.०० वाजता मा. उप-आयुक्त (अग्निशमन) यांचे दालनात उपस्थित दरपत्रकदार अथवा त्यांचे प्रतिनिधि यांचे समक्ष उघडण्यात येतील.

**स्थळ :- मुख्य कार्यालय, विरार (पश्चिम)**
**दिनांक :- ३ /०४/२०२५**

(सदानंद पुरव)
उप-आयुक्त (अग्निशमन)
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका
अग्निशमन दल
मुख्यकार्यालय